महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई-४०० ००१. ☎-२२६२०२३१/३२

क्रमांक:- डिओअे-२०१९/तीन/ १९९० दिनांक:- 5 DEC 2019

प्रति,

१.शासकीय कला महाविद्यालय

२.अशासकीय अनुदानितव अनुदानित कला महाविद्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय :- कला शिक्षक व प्रशिक्षण पदविका पुर्नरचित अभ्यासक्रमाबाबत

उपरोक्त विषयान्वये आणास कळविण्यात येते की, कला शिक्षक प्रशिक्षण पदविका (अे.टी.डी) पुर्नरचित अभ्यासक्रम तज्ञ सदस्यांनी तयार केलेला आहे. सदर अभ्यासक्रम दि. १५ ऑक्टो. २०१९ रोजी यशवंत कला महाविद्यालय, औरंगाबाद येथे एक दिवशीय समीक्षण सत्र घेऊन त्यात पुन्हा योग्य तो बदल करण्यात आलेला आहे. सदर समीक्षण सत्राकरीता महाराष्ट्रातील कला महाविद्यालयातील अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्रतिनीधी, मागासवर्गीय प्रतिनिधी, एनजीओ, मराठवाडा विकास महामंडळ, फेडरेशन प्रतिनीधी, महीला प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य कला महाविद्यालयीन शिक्षक शिक्षकेतर संघ प्रतिनिधी, प्राचार्य फेडरेशन प्रतिनिधी, विनाअनुदानित कला महाविद्यालय संघ प्रतिनिधी, सहायक अधिव्याख्याते असे एकत्रित ५० समीक्षकांना निमंत्रित करण्यात आले होते. समीक्षण सत्रात अभ्यासक्रमाबाबत त्यांचे अभिप्राय, सुचना व दुरुस्त्या मागवुन घेऊन त्याप्रमाणे तज्ञ व सदस्यांनी त्यामध्ये योग्य बदल केलेले आहेत.

सदरचा अभ्यासक्रम कला शिक्षक, कला प्रेमी व.इतर जनसामान्यांना वाचनास्तव उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. तसेच अभ्यासक्रम बाबत आपले आणखी काही अभिप्राय, सूचना व दुरुस्त्या असल्यास १५ दिवसाच्या आत (२५ डिसेबर २०१९ पर्यंत) अभ्यासक्रम समन्वयक, श्री. संदीप डोंगरे, सहायक निरीक्षक , चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय , लक्ष्मी नगर नागपूर ४४००२२ यांना लेखी स्वरुपात कळविण्यात याव्या.

सदर अभ्यासक्रम अंतीम झालेला नसून तज्ञ व सदस्यांची एका बैठकी नंतरच सुधारणा होऊन तो अंतीम स्वरुपात येईल. या अभ्यासक्रमाबाबत कार्यशाळा तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली नंतर घेण्यात येईल. तशा स्पष्ट सुचना आपणास कळविण्यात येतील.

5.12.2019

(राजीव मिश्रा)

प्र.कला संचालक

कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

मुंबई.

प्रत-

१) निवड नस्ती.